महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org

**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२६/ 1929

दिनांक :- 20 JUL 2026

प्रति,

प्राचार्य,
सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर संस्था.
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/२०२६/१५६९ दिनांक १९/६/२०२६.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/Intake Approval/२०२६/४७२ दिनांक ३०/६/२०२६.

३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/Intake Approval/२०२६/५१५ दिनांक ०९/०७/२०२६.

४) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/Intake Approval/२०२६/५५७ दिनांक २०/०७/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तूकला परिषद अशा शिखर परिषदांव्दारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असून पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना या शिखर परिषदांव्दारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार विद्यापिठांची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक १५ जूले २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करुन उपस्थित राहण्याबाबत आपणास निर्देश देण्यात आले होते.

तथापी मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र संदर्भ क्र. ४ नुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार विद्यापिठ संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन **दिनांक २२ जूलै २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर सादर करुन आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयात उपस्थित राहावे.** मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहिती कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित प्राचार्य / संचालक जबाबदार राहतील.

**सहपत्र :-** संदर्भीय पत्र.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती